C:\DATA - D\वाहन तळ.doc
219

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जा.क्र.नांवाशमनपा/जवमा/15499/२०२५

दिनांक - 21 MAR 2025

## ई-लिलाव सुचना (दुस-यांदा)

सर्व नागरीकांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे लेबर कॉलनी येथील अग्निशमन केंद्र येथील उर्वरीत ०५ गाळे/दुकाने खुल्या प्रवर्गातुन ३० वर्षासाठी भाडेपट्टीवर द्यावयाचे आहेत.

ईच्छुक नागरीकांनी / व्यापा-यांनी लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थाळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलाव फी रुपये ५०००/- (ना परतावा) तसेच इसारा रक्कम म्हणून रु.२५,०००/- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नांवे असलेले खाते क्रं.३१८०१०२०००००२१३ IFSC CODE - UTIB००००३१८ ॲक्सीस बँक, शाखा कलामंदिर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करुन त्या बाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे.

सदरील ई-लिलावाच्या नियम व अटी तसेच साईटवर अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी (https://eauction.gov.in) या संकेस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन, सदरचा ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन इंटरनेटवर वर भरता येईल.

### ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | लिलाव प्रसिध्दीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिध्द दिनांक | 22/03/2025 | १५:०० |
| २ | कागदपत्र/ऑक्शन फी सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 22/03/2025 | १६:०० |
| ३ | कागदपत्र अपलोड/ऑक्शन फी भरणा करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | 26/03/2025 | १५:०० |
| ४ | कागदपत्र/ऑक्शन मंजुरीचा दिनांक व वेळ | 26/03/2025 | १५:०० |
| ५ | कागदपत्र/ऑक्शन फी मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | 27/03/2025 | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | 28/03/2025 | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | 28/03/2025 | १५:०० |

कोणतेही कारण न देता सदरचा ई-लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांनी राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत कांही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्प लाईन नं.०१२०-४००-१००५ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.

स्वा/-
अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

प्रत -

१) संपादक, दै. टाईम्स ऑफ गौरव २) दै. दलीतवाणी ........ यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील लिलावाची जाहिर सुचना आपल्या दि. 22/03/2025 ---- च्या वृत्तपत्रात 12X15 ----चौ.मी. आकारात प्रसिध्द करुन बिलाच्या २ प्रती शासनाच्या मान्यतेच्या प्रतीसह सादर करावे.

२) सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग, यांना सदरील प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील ई-लिलाव उरोक्त नमुद कालावधीमध्ये घेण्यात यावा तसेच सदरील ई-लिलाव च्या नियम व अटी ची प्रत मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३) जन संपर्क विभाग, यांना सदरची प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील ई-लिलाव सुचना तसेच नियम व अटी ची प्रत महानगरपालिका नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.

अतिरीक्त आयुक्त
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड

# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे लेबर कॉलनी भागातील अग्निशमन केंद्र येथील दुकाने/गाळे भाडेपट्टीवर देणेसाठी ई-लिलाव नियम अटी

**प्रस्तावना**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे लेबर कॉलनी भागातील अग्निशमन केंद्र येथील ०४ गाळे भाडेपट्टीवर द्यावयाची आहेत. सदरील गाळ्यांचा/दुकानांचा क्रमांक इमारतीच्या दक्षिणेकडून उत्तरेकडे उतरत्या क्रमाणे आहे. सदर मार्केटमधील ०४ गाळे खुल्या प्रवर्गातुन भाडेपट्टीवर द्यावयाची आहेत.

➢ **वेबसाईटवर (http://eauction.gov.in) अपलोड करावयाची कागदपत्रे -**

- ई-लिलावात भाग घेण्यासाठी व्यक्तीच्या ओळखीचा पुरावा म्हणुन आधार कार्ड/पॅनकार्ड/मतदान कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/पासपोर्ट इत्यादीची प्रत अपलोड करणे.
- ई-लिलावात भाग घेण्यासाठी रक्कम रु.५,०००/- (ई-लिलाव प्रवेश शुल्क नापरतावा) तसेच रक्कम रु.२५,०००/-आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांच्या नावे असलेले खाते क्र.३१८०१०२०००००२१३, IFSC CODE - UTIB०००००३१८ ॲक्सीस बँक, शाखा कलामंदीर, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करुन त्याबाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे. रक्कम रु.२५,०००/- ही इसारा रक्कम असणार आहे. जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन गाळा/दुकान घेणार नाहीत अशा बोलीधारकांची इसारा रक्कम रु.२५,०००/- जप्त करण्यात येईल. तसेच सदरील ई-लिलावात ज्या बोलीधारकांना गाळा/दुकान भेटले नाही त्या बोलीधारकांची इसारा रक्कम रु.२५,०००/- परत करण्यात येईल. तसेच जे बोलीधारक अंतीम बोली बोलुन दुकान भाडेपट्टीवर घेतील त्यांची रु.२५,०००/- इसारा रक्कम प्रिमीयमच्या रक्कमेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.
- महानगरपालिका हद्दीतील मालमत्तेचा सालसन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर, पाणी कर इत्यादी भरणा केलेली पावती (महानगरपालिका हद्दीत मालमत्ता नसल्यास त्याबाबतचे लेखी स्वयंघोषणापत्र) तसेच महानगरपालिकेची कोणतीही थकबाकी प्रलंबीत नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र देखील अपलोड करणे अनिवार्य आहे.

➢ **ई-लिलाव अटी व शर्ती -**

१) ई-लिलावात भाग घेण्यासाठी डिजीटल सिग्निचर असणे अनिवार्य आहे.

२) एका दुकानासाठी बोली बोलावयाची असल्यास रुपये ५०००/- ई-लिलाव शुल्क भरणा करावी लागेल. तसेच एकापेक्षा जास्त दुकानासाठी बोली बोलावयाची असल्यास प्रत्येक दुकानासाठी रुपये ५०००/- ई-लिलाव शुल्क दुकान क्रमांक नमुद करुन भरणा करणे अनिवार्य आहे.

३) सदर ई-लिलावात दुकानाच्या बोलीची प्रिमीयम रक्कम व मासिक भाडे खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | गाळा/दुकान क्र. | प्रती गाळा/दुकानाचा आकार चौ.मी. (चटई क्षेत्र) | प्रती गाळा प्रिमीयम रक्कम (गाळा बांधकाम खर्चाची २५ टक्के रक्कम) | प्रतीमहा प्रती गाळा भाडे |
|---|---|---|---|---|
| १ | १ | (२.९ X ४.२३) १२.२६७ | २,५०,५३९/- | २०९५.६१/- |
| २ | २ | (२.२३ X ४.२३) ०९.४३२९ | १,९२,६५६/- | १६११.४५/- |
| ३ | ३ व ६ | (२.११ X ४.२३) ०८.९२५३ | १,८४,२८९/- | १५२४.७३/- |

सदरील मासिक भाडे यावर १८ टक्के जी.एस.टी आकारण्यात येईल. तसेच सदरील भाडेमध्ये दर ०३ वर्षाला १०% वाढ करण्यात येईल.

४) ई-लिलाव बोली ही प्रिमीयम रक्कमेच्या वर रु.२०,०००/- (अक्षरी- वीस हजार रुपये फक्त) च्या पटीत बोलणे अनिवार्य आहे.

५) ई-लिलावात सर्वात जास्त प्रिमीयम रक्कम देणा-या व्यक्तीस दुकान/गाळा मंजूरी देण्यात येईल.

६) सदर ठिकाणच्या दुकानाचा ताबा लिलाव प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर देण्यात येईल.

७) दुकान/गाळा मंजुर झाल्यावर प्रिमीयमची संपुर्ण रक्कम ०७ दिवसाच्या आत महानगरपालिका फंडात भरणा करावी लागेल. तदनंतरच करारनामा करुन देण्यात येईल.

८) गाळा/दुकानाचा भाडेपट्टा करारनामा ३० वर्षाचा असेल.

९) मुळ करारनामा संपुष्टात येण्याच्या आगोदरच भाडेकरुस दुकान महानगरपालिकेस परत करावयाचे असल्यास ई-लिलावात प्राप्त झालेली अंतीम प्रिमीयम रक्कम (विना व्याजी) दुकान महानगरपालिकेस परत केल्यानंतर तीन महिन्यात परत करण्यात येईल.

१०) सुरक्षा अनामत रक्कम म्हणुन ०३ महिन्याचे भाडे महानगरपालिका फंडात भरणा करणे अनिवार्य आहे.

११) मासिक भाडे थकीत राहिल्यास त्यावर प्रतीमहा ०२ टक्के सरळव्याज आकारण्यात येईल.

१२) लिलावधारकाने स्वखर्चाने नोंदणीकृत करारनामा महानगरपालिकेस करुन द्यावा लागेल.

१३) दुकानात पोटभाडेकरु ठेवावयाचा असल्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊनच नियमानुसार पोटभाडेकरु ठेवावा लागेल.

१४) महानगरपालिकेच्या मान्यतेशिवाय भाडेपट्ट्याचे हस्तांतरण परस्पर केले जाणार नाही किंवा मालमत्ता गहाण/तारण ठेवली जाणार नाही. तसेच त्यावर त्रयस्त पक्षाचे हितसंबंध प्रस्थापित/निर्माण करता येणार नाहीत.

१५) गाळा वापर करताना त्या इमारतीमधील इतर भाडेकरुंना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, याची दक्षता घ्यावी लागेल. तसेच गाळ्यामध्ये बियरबार, परमीट रुम, मटन दुकान, गिरणी, छापखाना, स्फोटक वस्तू असे व्यवसाय व इतरांना त्रास पोहचविणा-या व्यवसायासाठी वापर अनुज्ञेय राहणार नाही याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास आयुक्तांचा निर्णय अंतीम राहील.

१६) गाळा/दुकाना अंतर्गत विद्युतीकरणासाठी आवश्यक ते वायरींगचे काम संबंधीतांना महानगरपालिकेचे नाहरकत प्रमाणपत्र घेऊनच स्वखर्चाने करुन घ्यावे लागेल. विद्युत मीटर गाळेधारकास बसवुन घ्यावे लागेल. तसेच देखभालीसाठी येणारा खर्च संबंधीतास स्वत भरणा करावा लागेल. याबाबतीत भाडेकरुस कोणतीही तक्रार करता येणार नाही.

१७) गाळेधारकास महानगरपालिकेचे गाळा भाडे, मालमत्ता कर व इतर कर नियमीत भरणा करणे बंधनकारक आहे. तसेच महानगरपालिकेकडुन व्यवसाय परवानाही घ्यावा लागेल.

१८) गाळेधारकास गाळ्यामध्ये महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय फेरबदल करण्याचा अधिकार राहणार नाही. तसेच रंगरंगोटीसाठी येणारा खर्च भाडेकरुस स्वत: करावा लागेल.

१९) गाळेधारकाकडे सहा महिन्यापेक्षा जास्त दिवस गाळा भाडे थकीत राहिल्यास त्या विरुद्ध महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ८१ नुसार तसेच यासंबंधीत असलेले नियम /शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच दुकान महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन प्रिमीयम रक्कमेतुन थकीत रक्कम वजा करण्यात येईल.

२०) ई-लिलाव शुल्क म्हणुन एका दुकानासाठी भरणा केलेल्या रक्कम रु.५०००/- च्या पावतीचा वापर इतर दुकानांसाठी केल्यास बोलीधारकाविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

२१) बोलीधारकांनी बोललेल्या अंतीम प्रिमीयम बोली रक्कमेमध्ये काही तांत्रिक किंवा बोलीधारकाने वेबसाईटवर अपलोड केलेल्या कागदपत्रांमध्ये तफावत आढळुन आल्यास अंतीम बोलीधारक ठरविण्याचा अधिकार आयुक्त यांना राहील.

२२) ई-ऑक्शन या संकेतस्थळावर प्राप्त झालेली बोलीची नोंद हीच अंतीम असेल.

२३) सदरील ई-लिलाव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा, नियम अटीमध्ये अंशत: बदल करण्याचा अधिकार आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका यांना राहील. त्याबाबत लिलावधारकास कोणताही आक्षेप घेता येणार नाही.

२४) सदर ई-लिलाव https://eauction.gov.in या संकेतस्थळावर घेण्यात येत आहे.

२५) सदरील नियम अटी https://eauction.gov.inया संकेतस्थळावर तसेच www.nwcmc.gov.in या महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर, मनपा मुख्य प्रशासकिय इमारत येथे नोटीस बोर्डवर, मुख्य प्रशासकिय इमारत मालमत्ता विभाग (कक्ष क्र.२१५) इत्यादी ठिकाणी पहावयास मिळतील.

२६) सदरील लिलाव हा ई-लिलाव असुन बोलीधारक यांना उपरोक्त नमुद कागदपत्र वेबसाईटवर अपलोड करावयाची आहेत. सदरील कागदपत्रांची पूर्तता न केल्यास त्यांची बोली रद्द करुन संबंधीतास लिलाव प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

अतिरीक्त आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड